# शौर्य मराठी

महाराष्ट्राचे निडर दैनिक

RNI-MAHMAR/2023/89125

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | शुक्रवार, दि. ६ मार्च २०२६ | वर्ष २ रे | अंक ११४ किंमत : ५ रु. | पाने ४


**दिन विशेष...**

१८९६ : पहिल्या ऑलिम्पिक सामन्याचे (पुनरुज्जीवित) उद्घाटन.

१९५२ : मराठीतील श्रेष्ठ नाटककार आचार्य अत्रे यांनी श्यामची आई हा चित्रपट पडद्यावर आणला.

१९९२ : प्रसिध्द कादंबरीकार रणजित देसाई यांचे याच दिवशी निधन झाले.

| | |
|---|---|
| सेन्सेक्स | ८०,०१५.९० +८९९.७१ (१.१४%) |
| डॉलर | ₹ ९१.७० |

**आजचे तापमान** (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ३९ | १७ |
| दिल्ली | ३३ | १९ |
| मुंबई | ३७ | २२ |
| नागपूर | ३८ | १९ |
| पुणे | ३८ | १४ |

**सुविचार**

आपल्या जीवनाचा अर्थ शोधा; तो आपल्याला खऱ्या समाधानाकडे नेईल.

| सुर्योदय | सुर्यास्त |
|---|---|
| स.-७:०६ | संध्या-६:०० |

**सोने – चांदी**

| सोने(१० ग्रॅम) | चांदी (प्रति किलो) |
|---|---|
| १,६४,३८०/- | २,८५,०००/- |

**केळी भाव**

नवती : ७५१ ते ७७०

पिल बाग : २५१ ते २७०

कांदे बाग : ----

## थोडक्यात

### शेअर बाजारांमध्ये आज पुन्हा तेजी

**मुंबई ।** बुधवारच्या घसरणीनंतर आज भारतीय शेअर बाजारांमध्ये तेजी दिसून येत आहे. सेन्सेक्स आणि निफ्टी हे दोन्ही बेंचमार्क निर्देशांक सुरुवातीच्या व्यवहारातच तेजीत होते. बीएसईचा ३० शेअर्सचा सेन्सेक्स ४१४ अंकांनी वाढून ७९,५३० वर उघडला. दरम्यान, निफ्टी १३५ अंकांनी वाढून २४,६१५ वर उघडला. वॉल स्ट्रीटवर रात्रीच्या तेजीनंतर गुरुवारी सकाळी आशियाई बाजारांमध्ये तेजी दिसून आली. दक्षिण कोरियाचा कोस्पी सुरुवातीच्या वेळी १२ टक्क्यांहून अधिक वाढला. त्याचप्रमाणे, स्मॉल-कॅप कोस्डॅक ११ टक्क्यांनी वाढला. मागील सत्रात ३ टक्क्यांनी घसरल्यानंतर ४ टक्क्यांनी वाढला. हाँगकाँगचा हँग सेंग इंडेक्स फ्युचर्स २५,५३४ वर व्यवहार करत होता, जो मागील २५,२४९.४८ च्या बंदपेक्षा जास्त होता. बुधवारी अमेरिकन शेअर बाजार तंत्रज्ञान समभागांच्या नेतृत्वाखाली तेजीत बंद झाला.

# लष्करी संघर्ष हा कोणत्याही समस्येवरचा तोडगा नाही : पंतप्रधान

## आशियातील इस्त्रायल-इराण तणाव अन् युक्रेन युद्धावर भारताची भूमिका केली स्पष्ट

वृत्तसंस्था । नवी दिल्ली

**पश्चिम आशियात अमेरिका-इस्त्रायल विरुद्ध इराण यांच्यात युद्धाचा भडका उडाला असताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या युद्धावर महत्त्वाचे भाष्य केले आहे. फिनलंडचे राष्ट्राध्यक्ष अलेक्झांडर स्टब यांच्याशी झालेल्या चर्चेनंतर पंतप्रधान मोदी यांनी संयुक्त पत्रकार परिषदेत बोलत असताना युक्रेन आणि पश्चिम आशियातील सशस्त्र संघर्षावर भाष्य केले.**



पंतप्रधान मोदी म्हणाले, 'कायद्याचे राज्य, संवाद आणि राजनैतिक मुत्सद्देगिरीवर भारत विश्वास ठेवतो. लष्करी संघर्ष हा कोणत्याही समस्येवरचा तोडगा नाही'.

भारत आणि फिनलंड हे कायद्याचे राज्य, संवाद आणि राजनैतिक मुत्सद्देगिरीवर विश्वास ठेवतात. केवळ लष्करी संघर्ष कोणताही प्रश्न सोडवू शकत नाही.

(पान २ वर)

### ➤ फिनलंडचे राष्ट्राध्यक्ष काय म्हणाले?

फिनलंडचे राष्ट्राध्यक्ष अलेक्झांडर स्टब म्हणाले, 'आज आम्ही सुरक्षा विषयावर चर्चा केली. सध्या पश्चिम आशिया आणि युक्रेन याठिकाणी संघर्ष पेटला आहे. आमच्याबाबत बोलायचे झाल्यास रशियाची युक्रेनविरोधातील आक्रमकता बराच काळ टिकली आहे. रशिया-युक्रेन युद्धाला चार वर्ष होत आली आहेत. हे युद्ध संपुष्टात येणे हेच सर्वांच्या हिताचे आहे'.

# महाराष्ट्रातून ७ जणांची राज्यसभेवर बिनविरोध निवड



वृत्तसंस्था । मुंबई

**महाराष्ट्रातून रिक्त होणाऱ्या सात राज्यसभा जागांसाठी अर्ज दाखल करण्याची आजची अंतिम मुदत संपताच एक महत्त्वाची बाब स्पष्ट झाली. सात जागांसाठी नेमके सात अर्जच दाखल झाल्याने सर्व उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत.**

**सात निवडून आलेले उमेदवार**

महायुतीकडून -रामदास आठवले, विनोद तावडे, माया चिंतामण इवनाते, रामराव वडकुते (भाजप), ज्योती वाघमारे (शिवसेना शिंदे गट) आणि पार्थ पवार (राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट). महाविकास आघाडीकडून शरद पवार. औपचारिकदृष्ट्या मतदान १६ मार्च रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत होणार असून मतमोजणी त्याच दिवशी सायंकाळी ५ वाजता होईल. मात्र उमेदवारांची संख्या जागांइतकीच असल्याने निकाल आधीच निश्चित झाला आहे.राज्यसभा निवडणूक एकल हस्तांतरणीय मत पद्धतीने होते. महाराष्ट्र विधानसभेचे २८८ आमदार मतदार असतात. एक उमेदवार निवडून येण्यासाठी साधारण ३७ मते आवश्यक असतात. महायुतीकडे (पान २ वर)

# मुंबई भाजपच्या प्रवक्तापदी ॲड.अनिकेत निकम यांची निवड

प्रतिनिधी । जळगाव

**भाजपच्या संघटनात्मक रचनेत जळगाव जिल्ह्याचे महत्त्व सातत्याने वाढताना दिसत आहे. प्रदेश कार्यकारिणीवर जिल्ह्यातील दोन पदाधिकाऱ्यांची चिटणीसपदी नुकतीच नियुक्ती झाल्यानंतर आता राज्यसभेचे खासदार ॲड. उज्वल निकम यांचे सुपुत्र ॲड. अनिकेत निकम यांची मुंबई भाजपच्या कार्यकारिणीत महत्त्वाच्या पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. या नियुक्तीमुळे जिल्ह्याचा भाजपमधील राजकीय वजन आणखी वाढल्याचे मानले जात आहे.**



भाजपकडून पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी विविध स्तरांवर नवीन तरुण नेतृत्वाला संधी दिली जात आहे. त्याच पार्श्वभूमीवर ॲड. अनिकेत निकम यांची मुंबई भाजपच्या कार्यकारिणीत प्रवक्तापदी (पान २ वर)

# अमेरिका-इराण युद्धात चीन मध्यस्थी करणार?

## पश्चिम आशियामधील संघर्षाबाबत स्पष्ट केली भूमिका

वृत्तसंस्था । बीजिंग

**अमेरिका आणि इस्त्रायलने संयुक्तपणे इराणवर केलेल्या हल्ल्यानंतर मध्य पूर्वेत संघर्ष पेटला आहे. यादरम्यान भारताप्रमाणे चीनने देखील या संघर्षावर चर्चेतून मार्ग काढला गेला पाहिजे असे म्हटले आहे. चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते लिन जियान यांनी चीन हे युद्ध थांबवण्यासाठी मध्यस्थी करण्यास तयार असल्याचे म्हटले आहे. तसेच त्यांनी सर्व बाजूंनी संयम राखण्याचेही आवाहन केले आहे.**



'चीन शांततेची आशा सोडून देणार नाही आणि विधायक भूमिका बजावत राहिल', असेही चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाने म्हटले आहे. तसेच शांतता स्थापन व्हावी यासाठी मध्यपूर्वेतील देशांमध्ये विशेष दूत पाठवण्याची योजना असल्याचीही त्यांनी यावेळी स्पष्ट केली.

लिन यांनी माहिती दिली की परराष्ट्र मंत्री वांग यी यांनी आखाती देशांमधील राजकीय नेत्यांशी फोनवरून संवाद साधला आहे. यामध्ये युएईचे उपपंतप्रधान अब्दुल्ला बिन झायेद अल नाह्यान यांचाही समावेश आहे. चीनच्या परराष्ट्र मंत्री म्हणाले की, चीन राष्ट्रीय सुरक्षा कायम ठेवण्यासाठी युएईच्या पाठिशी उभा राहिल आणि हा वाद राजनैतिक मार्गाने सोडवण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या इतर आखाती देशांनाही चीनचा पाठिंबा असेल

त्यांच्या कार्यालयाने एक्सवर केलेल्या पोस्टमध्ये म्हटले की, 'युद्ध पसरणे हे कोणत्याही पक्षाच्या हिताचे नाही, आणि यामुळे फक्त लोकांचे हाल होतील'.

तसेच त्यांच्या कार्यालयाने माहिती दिली की, त्यांनी सौदी अरेबियाचे त्यांचे समकक्ष फैसल बिन फरहान अल सौद यांच्याशी देखील चर्चा केली आहे. तसेच त्यांनी सौदी अरेबियाने रास तनुरा तेल रिफायनरीवर ड्रोन हल्ला झाल्यानंतरही सौदीने दाखवलेल्या (पान २ वर)

### अमेरिकेने शेअर केला 'ऑपरेशन एपिक फ्युरी'चा थरारक व्हिडीओ

# इराणविरोधातील युद्धाचे १०० तास

वृत्तसंस्था । वॉशिंग्टन

**अमेरिका-इस्त्रायल या देशांनी संयुक्तपणे केलेल्या हल्ल्यात इराणचे सर्वोच्च नेते आयातुल्ला खामेनी यांचा मृत्यू झाला. यानंतर मध्य पूर्वेत संघर्ष पेटल्याचे पाहायला मिळत आहे. यादम्यान अमेरिकेने इस्त्रायलबरोबर मिळून इराणविरोधात राबवलेल्या या 'ऑपरेशन एपिक फ्युरी' मोहिमेचे पहिल्या १०० तासांचे फुटेज जारी केले आहे.**



युनायटेड स्टेट्स सेंट्रल कमांडने जारी केलेल्या या व्हिडिओमध्ये प्रचंड वेगाने उडणारी लढाऊ विमाने, समुद्रातील युद्धनौकांमधून क्षेपणास्त्रे डागली जात असताना आणि जमिनीवरील वाहने व तळांवर होणारे हल्ले पाहायला मिळत आहेत. २८ फेब्रुवारी रोजी सुरू झालेल्या या हवाई आणि नौदल हल्ल्यांमध्ये आतापर्यंत इराणमधील ७०० हून अधिक नागरिकांचा मृत्यू झाला आहे.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या आदेशानंतर ऑपरेशन एपिक फ्युरी लाँच करण्यात आले होते. अमेरिकन सैन्याने इस्त्रायलबरोबर मिळून सुनियोजितपणे इराणची सुरक्षा यंत्रणा आणि लष्करी यंत्रणा उद्ध्वस्त करण्यासाठी ही मोहिम हाती घेतली आहे.

या व्हिडीओबरोबर अमेरिकेने जारी केलेल्या निवेदनानुसार, ही मोहिम तात्काळ धोका असलेल्या लक्ष्यांवर केंद्रीत होती, ज्यामध्ये क्षेपणास्त्र प्रणाली, कमांड सेंटर्स आणि नेव्हल असेट्स यांचा समावेश होता.

या मोहिमेत अनेक अत्याधुनिक विमाने आणि शस्त्र प्रणाली वापरण्यात आली. तसेच युएस बॉम्बर्स आणि फायटर्स देखील वापरण्यात आले, ज्यामध्ये बी-२ स्पिरीट, एफ-३५ लाइटनिंग , एफ-२२ रॅप्टर आणि बी-५२ स्ट्रॅटोफोर्ट्रेस यांचा समावेश होता. ज्यांनी जीपीएस-गायडेड म्युनिशन जसे की जीबीयू-३१ जेडीएएमचा वापर केला. तसेच विमानांनी हवाई क्षेत्रात प्रवेश करण्यापूर्वी, अमेरिकन युद्धनौका आणि पाणबुड्यांवरून डागलेल्या लांब पल्ल्याच्या (पान २ वर)



**जळगाव : इराणविरोधात अमेरिकेसह इस्त्रायलने पुकारलेल्या युद्धास सहा दिवस उलटुनही कोणताही तोडगा निघत नसल्याने देशात पेट्रोल -डिझेल टंचाई निर्माण होईल, या भीतीने नागरिक शहरात पेट्राल भरण्यासाठी पंपांवर अशी गर्दी करताना दिसून येत आहेत.**

# शेतकरी कर्जमाफीचा निर्णय ३० जूनपूर्वी जाहीर केला जाईल : कृषिमंत्री

## ● कर्जबाजारी शेतकऱ्यांची परिस्थिती, कर्जरचनेचे स्वरूप, बँकांचा सहभाग ,आर्थिक परिणामांचा अभ्यास करून होईल निर्णय

वृत्तसंस्था । मुंबई

**राज्यातील कर्जबाजारी शेतकऱ्यांसाठी राज्य सरकारकडून मोठा दिलासा मिळण्याची शक्यता आहे. ३० जूनपूर्वी शेतकरी कर्जमाफीबाबतचा ऐतिहासिक निर्णय जाहीर केला जाईल, अशी महत्त्वाची माहिती कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी विधान परिषदेत दिली.**

शेतकरी कर्जमाफीच्या मुद्द्यावर सखोल अभ्यास करण्यासाठी प्रवीण परदेशी यांच्या अध्यक्षतेखाली एक उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे. एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात या समितीचा अहवाल प्राप्त होईल. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,



उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार हे एकत्रितपणे ३० जूनपूर्वी शेतकरी कर्जमाफ िबाबत निर्णय जाहीर करतील, असे कृषिमंत्र्यांकडून सांगण्यात आले आहे. दत्तात्रय भरणे यांनी कलम २६० अंतर्गत झालेल्या चर्चेला उत्तर देताना सरकार शेतकऱ्यांच्या हितासाठी ठाम असल्याचे सांगितले.

तसेच समिती राज्यातील कर्जबाजारी शेतकऱ्यांची परिस्थिती, कर्जरचनेचे स्वरूप, बँकांचा सहभाग आणि आर्थिक परिणाम यांचा सखोल अभ्यास करत आहे. अहवालाच्या आधारे व्यवहार्य आणि टिकाऊ निर्णय घेतला जाईल, असेही कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितले.

### ➤ शेतीसमोरील वाढते आव्हान

राज्यातील शेती हवामानातील अनिश्चिततेमुळे अधिकच जोखमीची बनली आहे. अवकाळी पाऊस, दुष्काळ, गारपीट यांसारख्या नैसर्गिक संकटांसोबतच कीड-रोगांचा वाढता प्रादुर्भाव शेतकऱ्यांसाठी डोकेदुखी ठरत आहे. उत्पादन खर्चात सातत्याने वाढ होत असताना बाजारभाव मात्र स्थिर नसल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडत आहे. या पार्श्वभूमीवर केवळ कर्जमाफी न करता दीर्घकालीन उपाययोजनांवर भर देण्याची गरज असल्याचे देखील भरणे यांनी स्पष्ट केले.

# एसटीच्या चालक-वाहकांची मद्यपान तपासणी सक्तीची ; परिवहन मंत्री

वृत्तसंस्था । मुंबई

**कर्तव्यावर असलेल्या कर्मचाऱ्यांना मद्यपानास आळा घालण्यासह प्रवाशांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देण्यासाठी कठोर उपाययोजना लागू करण्याचा निर्णय एसटी महामंडळाने घेतला आहे. आगारात कामावर हजर होणाऱ्या सर्व चालकांची मद्य तपासणी यंत्राद्वारे दररोज मद्यपान तपासणी करणे बंधनकारक असून, योग्य नोंदी घेऊनच चालकांना कर्तव्यावर पाठविण्यात येणार आहे.**

परळ बसस्थानकाला २५ जानेवारी रोजी प्रताप सरनाईक यांनी अचानक भेट दिली होती. यावेळी चालक-वाहकांच्या विश्रांतीगृहांमध्ये मद्याच्या बाटल्या आढळल्या होत्या. काही कर्मचारी मद्यधुंद अवस्थेत असल्याचेही निदर्शनास आले. याची गंभीर दखल घेत परिवहन मंत्र्यांनी तातडीने चौकशी समिती नेमून या प्रकरणास जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचे निर्देश दिले होते. तसेच असे प्रकार पुन्हा घडू नयेत यासाठी कडक उपाययोजना करण्यासही सांगितले होते. (पान २ वर)

## संपादकीय

### युद्धाची व्याप्ती वाढली

इराणवर अमेरिका आणि इस्रायल या दोन देशांनी संयुक्तपणे हल्ला करून जे युद्ध छेडले आहे ते युद्ध खामेनी यांच्या हत्येनंतर आटोक्यात येईल असे वाटले होते, पण त्याची व्याप्ती आता आणखीनच वाढली असून हा संघर्ष बेलगाम पातळीवर गेला आहे. इस्रायल आणि अमेरिकेच्या हल्ल्यात इराणचे राष्ट्रप्रमुख खामेनी यांच्याबरोबरच त्या देशाची जवळपास सगळी महत्त्वाची लीडरशिप गारद झाली. अनेक महत्त्वाचे लष्करी अधिकारीही मारले गेले. हा तडाखा अतिप्रचंड स्वरूपाचा होता, त्यातून इराण सावरण्याची शक्यता नाही, असे वाटत असतानाच इराणने आपली उरलीसुरली शक्ती वापरात आणून अंदाधुंद प्रतिसाद द्यायला सुरुवात केली आहे. आखातातल्या जवळपास आठ देशांवर इराणने क्षेपणास्त्राद्वारे मारा केला. इस्रायलवरही नव्याने हल्ला करताना थेट नेतान्याहू यांच्या कार्यालयालाही इराणने लक्ष केल्याचे वृत्त आहे. अमेरिकेची काही लढाऊ विमानेही इराणने पाडली. तसेच युरोपीय देशांच्याही काही लष्करी ठिकाणांवर इराणने हल्ले केल्याने या युद्धाची व्याप्ती आज अचानक वाढल्याचे लक्षात येते. ही परिस्थिती लक्षात घेऊन आखातात ब्रिटनचे जे काही लष्करी तळ आहेत त्या तळांचा वापर करण्याची अनुमती अमेरिकेने ब्रिटनकडे मागितली आणि ब्रिटननेही अमेरिकेला तातडीने ती अनुमती दिली आहे. ब्रिटन बरोबरच फ्रान्स, जर्मनी आणि अन्य काही युरोपीय देशांनी अमेरिकेचे समर्थन करून त्यांना साथ देण्याची भूमिका घेतली आहे. त्यामुळे हा मामला आता आणखीन गंभीर बनला असून आता एकाकी पडलेल्या इराणच्या बाजूनेही रशिया आणि चीन सारखे देश उतरतील काय अशी नवी शंका निर्माण झाली आहे. हे सगळे होत असतानाच हेजबुल्ला संघटनेनेही इराणच्या समर्थनार्थ इस्रायलवर हल्ले सुरू केले, त्यांना काबुत आणण्यासाठी इस्रायलने लेबनॉनवर हल्ले केले. तेथे मोठी जीवितहानी झाली. या सगळ्या घडामोडी उर्वरित जगाची झोप उडवणाऱ्या आहेत. इराणकडून जसे प्रत्युत्तराचे हल्ले सुरू झाले तसा अमेरिका आणि इस्रायलचा इराणवर नव्याने मारा सुरू झाला आहे. इराणवर अंदाधुंद बॉम्बफेक सुरू असून त्या देशात मृत नागरिकांचे अक्षरशः ढीग रचले गेल्याचे एका वृत्तांत म्हटले आहे. इराणमधील मृतांच्या नेमक्या संख्येचा अंदाज अजून लागू शकलेला नसला तरीही एका आंतरराष्ट्रीय संस्थेने इराणमध्ये सुरुवातीच्या दोन दिवसातच किमान ५५५ नागरिक ठार झाल्याची प्राथमिक माहिती दिली. पहिल्याच हल्ल्यात खामेनी आणि इराणच्या महत्त्वाच्या नेत्यांचा खात्मा केल्यानंतर हे युद्ध आटोक्यात येईल किंबहुना इराण भयभीत होऊन, दिशाहीन होईल असे जे वाटले होते तसे अजिबात झालेले दिसत नाही. इराणकडे अमेरिका आणि इस्रायलच्या तुलनेमध्ये अत्यंत मर्यादित लष्करी शक्ती आहे. त्यातच अमेरिका आणि इस्रायलने इराणच्या हवाईदलाचे कंबरडे साफ मोडले आहे. इराणच्या क्षेपणास्त्र प्रक्षेपण ठिकाणांवरही व्यापक स्वरूपात हल्ले करून ही ठिकाणे उद्ध्वस्त करण्यात आली आहेत. परंतु तरीही ज्या क्षमतेने इराणकडून प्रत्युत्तर दिले जात आहे ते अचंबित करणारे आहे. एका वृत्तानुसार इराणच्या आण्विक तळावरही हल्ला झाला आहे त्यातून ॲटोमिक रेडिएशन सुरू झाले किंवा कसे या वृत्ताची शहानिशा केली जात आहे. हे सगळे विनाशकारी रिपोर्टिंग ऐकल्यानंतर या युद्धाचा शेवट नेमका काय होईल याचा अंदाज लावणे अवघड झाले आहे.

# राजकीय वैमनस्यातून सरपंच-उपसरपंचांना संपवण्याचा कट!

## दस्केबर्डीच्या सरपंचांना अपघाताचा बनाव करून जीवे मारण्याचा प्रकार उघडकीस ; ४ अटकेत

प्रतिनिधी । चाळीसगाव

**तालुक्यात दस्केबर्डी गावाचे सरपंच–उपसरपंच यांना अपघाताचा बनाव करून जीवे मारण्याचा प्रयत्न झाल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी मेहुणबारे पोलिसांनी तपासचक्र फिरवित सखोल तपास करून चार संशयितांना अटक केली आहे. या गुन्ह्यात वापरलेली पिकअप वाहन देखील जप्त करण्यात आले आहे.**



दि.२६ जानेवारी २०२६ रोजी रात्रीच्या सुमारास ईश्वर उर्फ भैया लक्ष्म अहिरे आणि भगवान उत्तम देवरे (सरपंच, दस्केबर्डी) हे दोघे बुलेट मोटारसायकलीने चाळीसगाव येथून दस्केबर्डीकडे परत येत होते. यावेळी मेहुणबारे ते शिंदवाडी रस्त्यावर समोरून येणाऱ्या पिकअप वाहनाने त्यांच्या मोटारसायकलला जोरदार धडक दिली. या धडकेत दोघेही खाली पडले. यापैकी सरपंच भगवान देवरे हे गंभीर जखमी झाले. प्रारंभी हा साधा अपघात असला तरी हा प्रकार संशयास्पद असल्याचे उपसरपंच ईश्वर अहिरे यांनी म्हटले होते. दरम्यान, मेहुणबारे पोलीस ठाण्यात २५ फेब्रुवारी रोजी ईश्वर अहिरे (उपसरपंच, दस्केबर्डी) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून भारतीय दंड संहितेच्या विविध कलमांखाली गुन्हा नोंदवून तपास सुरू करण्यात आला होता. ईश्वर अहिरे यांनी घातपात झाल्याचा संशय व्यक्त केल्यानंतर पोलीस अधीक्षक डॉ. महेश्वर रेड्डी, अपर पोलिस अधीक्षक कविता नेरकर आणि चाळीसगावचे उपविभागीय पोलीस अधिकारी विजयकुमार ठाकूरवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपासाला गती देण्यात आली. या तपासादरम्यान पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही चित्रण, तांत्रिक माहिती तसेच इतर पुराव्यांच्या आधारे सखोल चौकशी केली. त्यातून हा अपघात नसून नियोजनपूर्वक घडवून आणलेला कट असल्याचे स्पष्ट झाले. दस्केबर्डी गावातील राजकीय वैमनस्यातून हा कट रचण्यात आल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले. या प्रकरणात भीमराव पांडुरंग रोकडे, सचिन भीमराव रोकडे, गोविंदा विठोबा माळी आणि लक्ष्मण अशोक महाजन (पिकअप वाहन मालक) या चार जणांना पोलिसांनी अटक केली आहे.

### ● खुनाचा प्रयत्न अन् कट रचल्याचे कलम लागू

मेहुणबारे पोलिसांनी गुन्ह्यात वापरलेले पिकअप वाहन जप्त केले असून संशयितांविरुद्ध अपघाताचे कलम कमी करून खुनाचा प्रयत्न आणि कट रचल्याचे गंभीर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. ही कारवाई सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण दातरे, पोलीस उपनिरीक्षक सुहास आव्हाड, उपनिरीक्षक विकास शिरोळे, पोलीस कर्मचारी किशोर पाटील, शांताराम पवार, सचिन निकम, योगेश पाटील, विनोद बेलदार, संजय लाटे यांच्या पथकाने यशस्वी केली. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक सुहास आव्हाड, पोलीस कर्मचारी संजय लाटे करीत आहेत.

## चित्ररथाद्वारे जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन

प्रतिनिधी । धुळे

सप्तशृंगी बहुद्देशीय महिला संस्था धुळे यांच्यातर्फे राबविण्यात येत असलेल्या बालविवाह मुक्त भारत या प्रकल्पांतर्गत विशेष जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. यात सध्या १०० दिवस बालविवाह मुक्त भारत अभियान विशेष विविध जनजागृती विशेष कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. धुळे जिल्ह्यातील ५० गावांमध्ये बालविवाह बाबत मोठ्या प्रमाणावर जनजागृती व्हावी या दृष्टिकोनातून चित्ररथा मार्फत जनजागृती करण्यात येत आहे. खासदार डॉ. शोभा बच्छाव यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून चित्ररथाचे स्वागत केले.

## कोलवीमाळ येथे शिक्षकाच्या गैरवर्तनामुळे विद्यार्थ्यांसह ग्रामस्थ हैराण

प्रतिनिधी । नंदुरबार

**अक्कलकुवा अंतर्गत येणाऱ्या कोलवीमाळ येथील जिल्हा परिषद शाळा केलीपाडा येथे कार्यरत एका शिक्षकाच्या वर्तनामुळे स्थानिक विद्यार्थी व ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. संबंधित शिक्षक कर्तव्यावर नियमित नसणे, दारूच्या नशेत शाळेत येणे तसेच सार्वजनिक रस्ता अडवून ग्रामस्थांना त्रास देणे अशा गंभीर तक्रारी पुढे आल्या असून त्यांच्यावर तात्काळ निलंबनाची कारवाई करण्यात यावी, अशी मागणी युवा क्रांती संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे.**



ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार सत्तरसिंग ओल्या वळवी हे कोलवीमाळ येथील रहिवासी असून ते जिल्हा परिषद शाळा कोलवीमाळ केलीपाडा येथे शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. मात्र ते अनेकदा अक्कलकुवा येथून ये–जा करीत असल्यामुळे शाळेत नियमित उपस्थित राहत नसल्याची तक्रार करण्यात आली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर गंभीर परिणाम होत असून शैक्षणिक वातावरणावरही विपरीत परिणाम होत असल्याची नाराजी पालक व ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. याशिवाय काही वेळा संबंधित शिक्षक दारूच्या नशेत शाळेत येत असल्याचेही ग्रामस्थांनी सांगितले आहे. शिक्षकी पेशा हा समाजात अत्यंत सन्मानाचा मानला जात असताना अशा प्रकारच्या

### कडक कारवाई करा - युवा क्रांतीची मागणी

वर्तनामुळे शिक्षकांच्या प्रतिमेलाही धक्का बसत असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली आहे. दरम्यान, कोलवीमाळ येथील देवपाडा परिसरात असलेल्या त्यांच्या घराजवळून देवपाड्याकडे जाणारा सार्वजनिक रस्ता आहे. या रस्त्यावर संबंधित शिक्षकांकडून मोठमोठे दगड टाकून रस्ता अडविणे तसेच दारूच्या नशेत रस्त्यावर खड्डे खोदून नागरिकांची ये–जा बंद करण्याचे प्रकार सुरू असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. या पार्श्वभूमीवर युवा क्रांतीचे प्रदेशाध्यक्ष ॲड. रुपसिंग वसावे यांनी गटशिक्षण अधिकारी, अक्कलकुवा यांना लेखी निवेदन सादर करून संपूर्ण प्रकरणाची तात्काळ चौकशी करण्यात यावी, अशी मागणी केली आहे.

## पान १ वरुन

**लष्करी संघर्ष हा कोणत्याही......**

यावर फिनलंड आणि भारताचे एकमत आहे. मग तो युक्रेनमधील संघर्ष असो किंवा पश्चिम आशियातील संघर्ष असो. हा संघर्ष लवकरात लवकर संपून शांतता प्रस्थापित व्हावी, अशी कामना आम्ही करतो, असेही पंतप्रधान मोदी म्हणाले. 'फिनलंडबरोबर यावर्षी आम्ही भारतात वर्ल्ड सर्क्युलर इकॉनॉमी फोरमचे आयोजन करत आहोत. यामुळे आमच्या शाश्वततेच्या प्रयत्नांना नवी गती आणि कल्पना प्राप्त होईल. वाढत्या जागतिक आव्हानांना तोंड देण्यासाठी जागतिक संस्थांमध्ये सुधारण करणे केवळ आवश्यकच नाही तर तातडीने यावर उपाययोजना करणे गरजेचे आहे. सर्व प्रकारच्या दहशतवादाला मुळापासून उखडून फेकण्याबद्दल आमचे एकमत आहे, असेही पंतप्रधान मोदी म्हणाले.

**महाराष्ट्रातून ७ जणांची......**

सध्या सुमारे २३० आमदारांचे संख्याबळ असल्याने सहा जागा सहज जिंकण्याची क्षमता आहे. महाविकास आघाडीकडे सुमारे ५० आमदार असल्याने शरद पवारांची एक जागा निश्चित होती.

**अमेरिका–इराण युद्धात......**

संयमाचे आणि या वादातून शांततापूर्ण तोडगा काढण्याच्या त्यांच्यावचबद्धतेचेही कौतुक केले. 'संघर्षाचा विस्तार आणि तीव्रता वाढत असून त्याचा परिणाम सौदी अरेबिया आणि इतर आखाती देशांवर होत आहे, हे चीन इच्छित नाही', असेही त्यांनी स्पष्ट केले. वांग यांनी रशिया, ओमान आणि फ्रान्स यांच्यासह इराण आणि इस्रायल या देशांबरोबर देखील चर्चा केली आहे.

**इराणविरोधातील युद्धाचे......**

टोमॅहॉक क्रूझ क्षेपणास्त्रांनी रडार इंस्टॉलेशन्स आणि कमांड सेंटर्सना लक्ष्य केले. युनायटेड स्टेट्स आणि त्यांच्या भागीदारांनी इतिहासातील सर्वात घातक, सर्वात गुंतगुंतीचे आणि सर्वात अचूक हवाई मोहिम ऑपरेशन एपिक फ्युरी लाँच केले आहे, असे या व्हिडिओत सांगण्यात आले. त्यात पुढे नमूद करण्यात आले आहे की, अमेरिकन सैन्य इराणची अमेरिकन नागरिकांना धमकावण्याची क्षमता नष्ट करण्यासाठी एक अभूतपूर्व मोहीम राबवत आहे. याव्यतिरिक्त, हा हल्ला इराणच्या नौदलाला लक्ष्य करत असल्याचा दावाही निवेदनात करण्यात आला आहे. तसेच यामध्ये इराणच्या नौदलाला देखील लक्ष्य केल्याचा दावा करण्यात आला आहे. व्हिडिओच्या शेवटी ट्रम्प यांच्या आवाजातील व्हाईसओव्हरमध्ये म्हटले आहे की, या क्षणी कॉम्बॅट ऑपरेशन्स पूर्ण ताकदीने सुरू आहेत आणि आमची सर्व उद्दिष्टे साध्य होईपर्यंत ते सुरूच राहतील.

**एसटीच्या चालक–वाहकांची......**

त्याअनुषंगाने एसटी प्रशासनाने तीन अधिकाऱ्यांची समिती नेमून सखोल चौकशी केली. चौकशीत दोषी आढळलेल्या अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करून, असे प्रकार पुन्हा घडू नयेत यासाठी आवश्यक उपाययोजनाही सुचविल्या आहेत. चौकशी अहवाल सरनाईक यांना सादर केला असून निर्देशानुसार दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई सुरू केली आहे. समितीने सुचविलेल्या उपाययोजना तातडीने सर्व आगारांमध्ये लागू करण्याचे निर्देशही दिले आहेत. नव्या उपाययोजना काय ? – चालकांची वाहन परीक्षकांद्वारे नियमित मद्यपान तपासणी होणार आहे. वाहकांचीही मद्य तपासणी करून नोंद ठेवणे आवश्यक आहे. चालक वाहकांची मद्यपान तपासणी झाली की नाही, यावर सहाय्यक कार्यशाळा अधीक्षक, सहाय्यक वाहतूक अधीक्षक, वाहतूक निरीक्षक, सहाय्यक वाहतूक निरीक्षक आणि वाहतूक नियंत्रक यांनी देखरेख ठेवायची आहे. आगार व्यवस्थापकांनीही नियमित नियंत्रण ठेवायचे आहे. बस मार्गावर असताना चालकाने नियंत्रण कक्षात (कामाची) लॉगबुकची नोंद करणे बंधनकारक आहे.

**मुंबई भाजपच्या प्रवक्तापदी......**

निवड करण्यात आली आहे. कायद्याचे शिक्षण, सार्वजनिक जीवनातील सक्रियता आणि संघटनात्मक कामातील सहभाग यामुळे पक्ष नेतृत्वाने त्यांच्यावर ही मोठी जबाबदारी सोपविल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली. ॲड. अनिकेत निकम हे ख्यातनाम सरकारी वकील तसेच सध्या राज्यसभेचे खासदार असलेले ॲड. उज्ज्वल निकम यांचे सुपुत्र आहेत.

उज्ज्वल निकम यांनी मुंबई बॉम्बस्फोट खटला तसेच २६/११ दहशतवादी हल्ला यांसारख्या अनेक गाजलेल्या प्रकरणांमध्ये सरकारतर्फे यशस्वीपणे युक्तिवाद करून देशभरात वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या कार्याचा प्रभाव आणि सार्वजनिक जीवनातील सक्रियता यामुळे निकम कुटुंबाची एक वेगळी छाप पडली आहे. आता त्याच परंपरेतून ॲड. अनिकेत निकम हे देखील भाजपच्या माध्यमातून राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात सक्रिय होत असल्याचे दिसून येत आहे.

## प्री–कॉन्फरन्स वर्कशॉपमध्ये विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वितरण

प्रतिनिधी । जळगाव

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील संगणक शास्त्र प्रशाळेच्यावतीने प्री–कॉन्फरन्स वर्कशॉपमध्ये सहभागी विद्यार्थी संशोधक आणि मान्यवर यांच्यासाठी प्रमाणपत्र वितरण सोहळा आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमास विज्ञान आणि तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता प्राचार्य डॉ.एस.एस.राजपूत व वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता प्रा. अनिल डोंगरे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संगणक शास्त्र प्रशाळेचे संचालक प्रा. राकेश रामटेके होते. यावेळी संगणक शास्त्र प्रशाळेच्या विद्यार्थ्यांसाठी सन १९९७–२००० बॅचच्या माजी विद्यार्थ्यांनी मित्राच्या स्मरणार्थ स्थापित प्रवीण देशमुख चॅरिटेबल ट्रस्ट संस्थेच्यावतीने प्रोग्रामर ऑफ द फ्युचर स्कॉलरशिपची घोषणा करण्यात आली.

## रस्त्यावर कचरा फेकणाऱ्या आस्थापनाला नोटीस !

प्रतिनिधी । धुळे

**शहरातील रस्त्यावर कचरा टाकणारे दुकानदार सार्वजनिक आरोग्यास धोका निर्माण करीत असल्यास त्यांना स्वच्छता निरीक्षकांमार्फत नोटीस बजावण्याचे आदेश आयुक्त नितीन कापडणीस यांनी दिले आहे.**




मुख्य रस्त्यावर सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकून अस्वच्छता होत असल्याची बाबत वारंवार निदर्शनास आलेली आहे. त्या अनुषंगाने ही कार्यवाही आयुक्त नितीन कापडणीस यांच्या आदेशाने करण्यात येत आहे. या नोटीसमध्ये नमूद करण्यात आले की, धुळे महानगरपालिका क्षेत्रात स्वच्छता विषय दैनंदिन पाहणीदरम्यान दुकानदार सार्वजनिक ठिकाणी उघड्यावर कचरा टाकत असल्याचे निदर्शनास आले आहे. या कृत्यामुळे अस्वच्छता पसरून सार्वजनिक आरोग्याला धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. आपल्या मालमत्तेत निर्माण होणारा कचरा उघड्यावर न टाकता महापालिकेच्या स्वच्छता कर्मचाऱ्याकडे अथवा महापालिकेच्या कचरा संकलन वाहनांमध्ये जमा करावा. तसेच सूचनेचे पालन न केल्यास आपल्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम २७१,२७२,२८०, २९२, व २९३ अन्वये पुन्हा दाखल करण्यात येईल व दंडात्मक कारवाई करण्यात येईल, असे नोटीसमध्ये नमूद करण्यात आले आहे. प्रभागातील स्वच्छता निरीक्षकांचे नाव, संकलन करण्याची वेळ त्याचप्रमाणे कचरा संकलनासाठी जबाबदार कर्मचाऱ्यांचे नाव व संपर्क क्रमांक देण्यात आलेला आहे. या कारवाईसाठी मुख्य स्वच्छता निरीक्षक राजेश वसावे, लक्ष्मण पाटील व सर्व स्वच्छता निरीक्षक कार्यवाही करीत आहे.

## आर.सी.पटेल स्कूलच्या वेद ठाकरेने पटकावले पारितोषिक

प्रतिनिधी । शिरपूर

**पुणे येथे नुकत्याच संपन्न झालेल्या बिझ टँक २०२६ या प्रतिष्ठित स्टार्टअप आणि बिझनेस आयडिया स्पर्धेत शिरपूर येथील आर. सी. पटेल इंग्लिश मीडियम सेकेंडरी स्कूलचा इयत्ता आठवीचा विद्यार्थी वेद मंगेश ठाकरे याने आपल्या कल्पक व्यवसायाची मांडणी करून दिग्गज गुंतवणूकदारांची मने जिंकली आहेत. त्याच्या यशाने शाळेच्या यशात मानाचा तुरा रोवला गेला आहे.**



या स्पर्धेत पुणे आणि राज्यातील नामवंत संस्थांच्या पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. अवघ्या १३ वर्षांच्या वेद मंगेश ठाकरे याने मोठ्या आत्मविश्वासाने आपली व्यावसायिक संकल्पना सादर केली. त्याच्या या धाडसाचे आणि कल्पकतेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

प्रारंभिक उद्यमितेला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने गुंतवणूकदारांनी त्याला २१ हजार रुपयांचे विशेष पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

या विद्यार्थ्याने शालेय वयातच उद्योजकतेचे धडे गिरवून मिळवलेल्या या यशामुळे शिरपूर परिसरात आनंदाचे वातावरण आहे. संस्थेचे अध्यक्ष माजी मंत्री, आ.अमरिशभाई पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, लोकनियुक्त नगराध्यक्ष चिंतनभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, सचिव रेषा पटेल, संस्थेचे संचालक अतुल भंडारी, संचालक विजय भंडारी, सीईओ डॉ. उमेश शर्मा, प्राचार्य डॉ. अमोल परब, उपप्राचार्य जितेंद्र पाटील, सर्व शिक्षक, पालक आदींनी वेद ठाकरे या विद्यार्थ्याचे अभिनंदन केले आहे.

## बहिणाबाई विद्यालयात विज्ञान साहित्य दालनाचे उद्घाटन

प्रतिनिधी । जळगाव

शहरातील बहिणाबाई विद्यालयात विज्ञान साहित्य दालनाचे उदघाटन करण्यात आले. विविध विज्ञानाच्या उपकरणांच्या निर्मितीतून विद्यार्थ्यात संशोधन वृत्ती वाढीस लागते. निरीक्षण करण्याची सवय लागते व आत्मविश्वास देखील वाढतो असे प्रतिपादन मुख्याध्यापक डॉ. विलास नारखेडे यांनी केले. प्रतिभा खडके यांनी भारतरत्न डॉ.सी व्ही रमण यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. लहान गट खुशी गजानन खडसे, कार्तिक नामदेव कोळी, आयेशा संजय तडवी, अवनी नितीन मोरे. मोठा गट हर्षल केशव पाथरवट, रोशनी प्रेमसिंग राठोड, निलेश सुरवाडे, हेमंत गणेश भोई यांनी विजयश्री प्राप्त केले. विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमातील विज्ञान विषय घटकांवर आधारित पोस्टर प्रदर्शन भरवून वैज्ञानिक माहिती दिली. याप्रसंगी राजेश वाणी, दिनेश चौधरी, संतोष पाटील, विशाल पाटील, सीमा चौधरी, दुर्गादास कोल्हे, संतोष पाटील उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक – सागर काशिनाथ ओतारी **(मोबा.– ९९७००५३०६६)** व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी –३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव –४२५००१ येथे छापून शॉप नं. ई–१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव– ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
**✲ कार्यकारी संपादक – किशोर शंकर शिंपी** (✲ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) कार्यालय दूरध्वनी क्र. : ०२५७–२२२४०६६, E-Mail : shauryamarathi@gmail.com

# विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी पोषक वातावरण मिळणे आवश्यक : सोमवंशी

## जिल्हा परिषद जळगाव-भारतीय विद्या भवन यांच्या संयुक्त विद्यमाने निशुल्क अभ्यासिका केंद्राचे उद्‌घाटन

प्रतिनिधी । जळगाव

**विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी पोषक वातावरण मिळणे अत्यंत आवश्यक असते. या अभ्यासिकेमुळे विद्यार्थ्यांना शांत व सकारात्मक वातावरणात अभ्यास करता येणार असून ही सुविधा पूर्णपणे मोफत आहे. तसेच लवकरच येथे वाचनालयही सुरू करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली व गरजू विद्यार्थ्यांनी या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रणधीर सोमवंशी यांनी केले.**





जिल्हा परिषद जळगाव व भारतीय विद्या भवन यांच्या संयुक्त विद्यमाने एमआयडीसी परिसरातील डॉ. किशन काबरा सभागृह येथे सुरू करण्यात आलेल्या निशुल्क अभ्यासिका व सांस्कृतिक केंद्राचे उद्घाटन दि. ५ मार्च रोजी जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रणधीर सोमवंशी यांच्या हस्ते झाले. त्याप्रसंगी ते बोलत होते. या कार्यक्रमास जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे कार्यकारी संचालक आर. एस. लोखंडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी मनोज चौधर, संजय बिर्ला, श्रेयांश काबरा, सपना काबरा, प्रा.डॉ.सीमा जोशी, प्राथमिक उपशिक्षण अधिकारी नरेंद्र चौधरी, उपशिक्षण अधिकारी विजय सरोदे आदी मान्यवर उपस्थित होते. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल यांच्या संकल्पनेतून ही अभ्यासिका सुरू करण्यात आली आहे. ग्रामीण व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील अभ्यासू विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी शांत, सुरक्षित व पोषक वातावरण उपलब्ध व्हावे, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमात प्रकल्प संचालक आर.एस. लोखंडे यांनी अभ्यासिका सुरू करण्यामागील उद्देश स्पष्ट करताना सांगितले की, या इमारतीचा उपयोग पुढील काळातही सामाजिक व शैक्षणिक उपक्रमांसाठी करण्यात येणार आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्रेयांश काबरा यांनी केले. सूत्रसंचालन गिरीश कुलकर्णी यांनी केले तर आभार संजय बिर्ला यांनी मानले.

### ➤ जळगावात दुसरी अभ्यासिका कार्यान्वित

**यापूर्वी शहरातील विद्यानिकेतन शाळेत जिल्हा परिषदेमार्फत सुरू करण्यात आलेल्या मोफत अभ्यासिकेला विद्यार्थ्यांचा उत्तम प्रतिसाद मिळाल्यानंतर एमआयडीसी परिसरातील विद्यार्थ्यांसाठी देखील अशी सुविधा उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार आर.एल. चौफुली परिसरात असलेल्या भारतीय विद्या भवनच्या इमारतीत ही अभ्यासिका सुरू करण्यात आली आहे. जळगावात आता दुसरी अभ्यासिका कार्यान्वित झाली आहे.**

## थोडक्यात

### तरसोदजवळ हॉटेल सावनला भीषण आग

**जळगाव ।** तालुक्यातील तरसोद फाट्याजवळ असलेल्या हॉटेल सावनला बुधवारी सकाळी साडेआठ वाजेच्या सुमारास शॉर्टसर्किटमुळे भीषण आग लागली. या आगीत हॉटेलचे लाखोंचे नुकसान झाले असून, सुदैवाने हॉटेलमधील पाच जिवंत गॅस सिलेंडर वेळीच बाहेर काढल्यामुळे मोठी दुर्घटना आणि जीवितहानी टळली आहे. तरसोद फाट्याजवळील हॉटेल सावनमध्ये पीओपी नूतनीकरणाचे काम सुरू होते. बुधवारी अचानक शॉर्टसर्किट झाले आणि आगीने रौद्र रूप धारण केले. हॉटेलचे छत पूर्णपणे पीओपीचे असल्याने संपूर्ण हॉटेलला आगीने वेढले. त्यामुळे धुराचे लोट दिसत होते.

### मू.जे.महाविद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा

**जळगाव ।** मू.जे.महाविद्यालयातील रसायनशास्त्र विभागात राष्ट्रीय विज्ञान दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात ४० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवून उपक्रम यशस्वी केला. कार्यक्रमाचे आयोजन विभागप्रमुख डॉ.योगेश मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यक्रम समन्वयक म्हणून डॉ. जयश्री भिरुड, डॉ. मनोज पांडे व सोनल उपलपवार यांनी सहकार्य केले. प्रा. डॉ. राहुल महिरे, डॉ. वसीम शेख, डॉ. रवींद्र पाटील, डॉ. राजेंद्र पाटील व श्री. संदीप पाडवी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या निमित्ताने पोस्टर सादरीकरण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. दैनंदिन जीवनातील रसायनशास्त्र व भारतीय ज्ञान प्रणाली हा विषय दिला होता. सर्व पोस्टर्स हस्तनिर्मित स्वरूपात सादर करण्यात आले. विद्यार्थ्यांनी कल्पक व माहितीपूर्ण पोस्टर्स सादर केली. स्पर्धेचे मूल्यमापन डॉ. भाग्यश्री भलवतकर व डॉ. राठोड यांनी केले.

## अनधिकृत हॉकर्सवर तत्काळ कारवाई करा: महापौर

प्रतिनिधी । जळगाव

**शहरातील हॉकर्सचा प्रश्न, वाढती गर्दी आणि अतिक्रमणाच्या मुद्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. महापौर दीपमाला काळे यांनी अनधिकृत हॉकर्सवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश देत, अतिक्रमण विभागाला वशिलेबाजी न करण्याच्या सूचना दिल्या. महापौर यांच्या दालनात शहर फेरीवाला समितीची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली.**

या बैठकीला महापौर दीपमाला काळे, उपमहापौर मनोज चौधरी, मोहन तिवारी, नंदू पाटील, अतिक्रमण विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. हॉकर्स समितीच्या प्रतिनिधींनी यावेळी आपल्या विविध मागण्या आणि अडचणी मांडल्या. शहरात टाईम झोन निश्चित करून त्यानुसार हॉकर्सला व्यवसाय करण्याची परवानगी द्यावी, अशी मागणी समितीने केली. फुले मार्केटमध्ये ज्या २६५ जणांना बसण्याची जागा दिली आहे, त्यांना प्राधान्याने अधिकृत जागा उपलब्ध करून द्यावी. हॉकर्सनी व्यवसाय संपल्यानंतर परिसर स्वच्छ ठेवावा, अशा सूचना केल्या. महापौर दीपमाला काळे यांनी सांगितले की, व्यवसाय संपल्यानंतर हातगाड्या त्याच ठिकाणी सोडून जाऊ नयेत, अन्यथा कारवाई केली जाईल. बैठकीत काही हॉकर्सनी तक्रार केली की, अतिक्रमण विभाग केवळ गरीब विक्रेत्यांवर कारवाई करतो, यावर महापौरांनी संताप व्यक्त करत स्पष्ट आदेश दिले की, कोणाचाही फोन आला तरी डगमगू नका, अनधिकृत हॉकर्सवर तात्काळ दंडात्मक कारवाई करा. आम्हा लोकप्रतिनिधींना अतिक्रमण दिसते, मग अतिक्रमण विभागाच्या कर्मचाऱ्यांना का दिसत नाही? असा सवाल त्यांनी केला. महामार्गावरील अतिक्रमण देखील पुढील दोन ते तीन दिवसांत काढण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

## मू.जे.महाविद्यालय करिअर कट्टयाला आठ राज्यस्तरीय पुरस्कार

प्रतिनिधी । जळगाव

मुळजी जेठा महाविद्यालय करिअर कट्टा विभागाला आठ राज्यस्तरीय पुरस्कार महाराष्ट्र राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत यांच्याहस्ते प्रदान करण्यात आला.



मुळजी जेठा महाविद्यालय करिअर कट्टा विभागाला, महाराष्ट्र राज्य उच्च तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र तसेच सेंट झेवियर्स कॉलेज मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने मुंबई येथील यशवंतराव चव्हाण सेंटर येथे संपन्न झालेल्या करिअर कट्टा उपक्रमाच्या पाचवा वर्धापन दिनाला राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा तसेच विकसित भारत २०४७: महाराष्ट्राच्या आर्थिक विकासामध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण व उच्च शिक्षणाची भूमिका या कार्यशाळेत, आणि या संपूर्ण कार्यक्रमांतर्गत मुळजी जेठा महाविद्यालय करिअर कट्टा टिमला एकूण आठ राज्यस्तरीय पुरस्कार महाराष्ट्र राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत, खादी ग्रामोद्योग महामंडळाचे अध्यक्ष रविंद्र साठे, सोलर इंडियाचे अध्यक्ष प्रफुल्ल पाठक यांच्या हस्ते देण्यात आले. त्यात प्रामुख्याने उत्कृष्ट करिअर कट्टा राज्यस्तरीय तिसरे (पन्नास हजार रु.), विभागीय करिअर कट्टा पहिले, तसेच उत्कृष्ट करिअर संसद, राज्यस्तरीय सर्वात जास्त व्हुअर्स प्रथम यासह आणखी पाच या महत्त्वाच्या पुरस्काराचा समावेश आहे.हे सर्व केसीई सोसायटीचे अध्यक्ष नंदकुमार बेंडाळे, प्रा मृणालिनी फडणवीस, प्राचार्य प्रा संजय भारंबे, यशवंत शितोळे, डॉ शमा सराफ, निलम पाटील यांच्या नेतृत्वात, एम.जे. कॉलेजचे उत्साही विद्यार्थी करिअर संसद यांच्यामुळे शक्य झाले.

## ओरीयन इंग्लिश मीडियम स्कुलमध्ये सिनिअर केजीचा पदवीदान उत्साहात

प्रतिनिधी । जळगाव

ओरीयन इंग्लिश मीडियम स्टेट बोर्ड स्कूलमध्ये ५ मार्च रोजी सिनिअर केजीच्या विद्यार्थ्यांचा पदवीदान मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. हा कार्यक्रम विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासातील महत्त्वाचा टप्पा ठरला.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते सरस्वती पूजनाने करण्यात आली. या प्रसंगी केसीई सोसायटीचे सचिव ॲड. प्रमोद पाटील, सदस्य डॉ.अशोक राणे, मुख्याध्यापक श्रीधर सुनकरी, उपमुख्याध्यापिका रजनी गोजोरेकर उपस्थित होते. मान्यवरांचा सत्कार मुख्याध्यापकांच्या हस्ते करण्यात आला.

या कार्यक्रमात नर्सरी व ज्युनियर केजीच्या विद्यार्थ्यांनी आकर्षक नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते सिनिअर केजीच्या विद्यार्थ्यांना पदवीदान सर्टिफिकेट प्रदान करण्यात आले.

## सार्वजनिक विद्यालयात कुसुमाग्रजांच्या कवितांचे वाचन

प्रतिनिधी । जळगाव

**सार्वजनिक विद्यालय असोदा येथे मराठी भाषा गौरव दिनानिमित्त कवी कुसुमाग्रज यांच्या कवितांच्या वाचनाचा कार्यक्रम घेण्यात आला.**



इयत्ता आठवीच्या विद्यार्थिनी शाश्वती माळी, सृष्टी डोळसे, हेतल कोल्हे, हर्षाली पाटील, वैष्णवी पाटील यांनी कवितांचे वाचन व गायन केले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मंगला नारखेडे यांनी भूषवले. सर्वांनी आपल्या मराठी भाषेचा अभिमान बाळगायला पाहिजे, असे त्यांनी सांगितले. प्रमुख वक्त्या भारती पाटील यांनी मराठी राजभाषा दिन व मराठी गौरव दिन यातील फरक स्पष्ट करून कुसुमाग्रज यांच्या साहित्यांना उजाळा दिला. डॉ.मिलिंद बागुल यांनी मराठी साहित्य क्षेत्रामध्ये कवी कुसुमाग्रज यांचे महान कार्य व योगदानाविषयी आपले मत व्यक्त केले. सूत्रसंचालन आकाश बाजगीर तर आभार संतोष कचरे यांनी मानले.

## अवैध वाळू वाहतुकीत जप्त वाहनांचा १२ मार्च रोजी लिलाव

प्रतिनिधी । जळगाव

तालुक्यात अवैध गौण खनिज (वाळू) वाहतुकीत जप्त करण्यात आलेली वाहने प्रशासकीय इमारत आवार, आकाशवाणी चौक, जळगाव येथे ठेवण्यात आलेली आहेत. या वाहनांपैकी अनेक वाहनमालकांनी शासकीय दंडाची रक्कम तहसील कार्यालयात भरणा केलेली नसल्याने अशा वाहनांचा जाहीर लिलाव करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. त्याअनुषंगाने एकूण ३४ वाहनांचा जाहीर लिलाव १२ मार्च रोजी सकाळी ११ वाजता तहसील कार्यालय, जळगाव येथे जाहीर बोली पद्धतीने करण्यात येणार आहे. लिलावासाठी असलेल्या वाहनांची सविस्तर माहिती, हातची किंमत, दंडाची रक्कम तसेच लिलावाच्या सर्व अटी व शर्ती तहसील कार्यालय, जळगाव येथील नोटीस बोर्डावर उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

## समाजकार्य महाविद्यालयात दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन

प्रतिनिधी । जळगाव

धनाजी नाना चौधरी विद्या प्रबोधिनी संचलित लोकसेवक मधुकरराव चौधरी समाजकार्य महाविद्यालय आणि महाराष्ट्र असोसिएशन ऑफ सोशल वर्क एज्युकेटर्स (मासवे) यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ८ व ९ मार्च रोजी दोन दिवसीय बहुविद्याशाखीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. सदर परिषदेचा विषय सामाजिक कायदे : शाश्वत आणि समावेशी विकास साध्य करण्यात कायद्याची भूमिका असा आहे.

उद्घाटन समारंभाचे अध्यक्ष संस्थेचे अध्यक्ष माजी आमदार शिरीष चौधरी राहणार असून, उद्घाटक म्हणून महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष माजी न्यायमूर्ती सुनिल शुक्रे, मुंबई यांची उपस्थिती राहणार आहे. प्रमुख अतिथी म्हणून प्राचार्य मधुकर कुऱ्हाडे (मुंबई), महाराष्ट्र असोसिएशन ऑफ सोशल वर्क एज्युकेटर्सचे संस्थापक व कार्यकारी अध्यक्ष अंबादास मोहिते, संस्थेचे उपाध्यक्ष सुनील पाटील, संस्थेचे सचिव डॉ. पी.आर.चौधरी, संचालक डॉ. विनय पाटील, संचालक चंदन अत्तरदे आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राकेश चौधरी उपस्थित राहणार आहे. राष्ट्रीय परिषदेचे बीज भाषण मासवेचे संस्थापक अध्यक्ष प्रा.अंबादास मोहिते करतील.

## डॉ. उल्हास पाटील कृषी महाविद्यालयाचे कृषीविश्व स्नेहसंमेलन उत्साहात

### चार दिवस विविध स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रमांनी महाविद्यालय परिसर दुमदुमला

प्रतिनिधी । जळगाव

**गोदावरी फॉउंडेशन संचलित डॉ. उल्हास पाटील कॉलेज ऑफ ॲग्रीकल्चर जळगाव येथे आयोजित कृषीविश्व २०२६ या वार्षिक स्नेहसंमेलनाचा सोहळा विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागाने व आनंदमय वातावरणात पार पडला.**

विविध स्पर्धा, उपक्रम व सांस्कृतिक कार्यक्रमांनी महाविद्यालय परिसर दुमदुमला. कार्यक्रमाचे उद्घाटन प्रसंगी प्राचार्य डॉ. शैलेश तायडे, डॉ.पी.आर. सपकाळे, डॉ.ए.पी.चौधरी, प्रशासकीय अधिकारी मोहन सुर्यवंशी तसेच उपप्राचार्य प्रा.पी. एस.देवरे उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते औक्षण, रिबीन कापून उद्घाटन, प्रतिमापूजन व दीपप्रज्वलन करून सुरुवात करण्यात आली. यावेळी अध्यक्षीय भाषणात डॉ. शैलेश तायडे यांनी स्नेहसंमेलनाचे महत्त्व अधोरेखित करत अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व व्यक्तिमत्त्व विकासाला चालना मिळते. तसेच आयोजनासाठी परिश्रम घेणाऱ्या विद्यार्थी समितीचे विशेष कौतुक करण्यात आले. स्नेहसंमेलनादरम्यान मंडला आर्ट, पोस्टर मेकिंग, वन मिनिट टास्क, अंताक्षरी आदी स्पर्धांना विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. वन मिनिट टास्क स्पर्धेत महेश पाटील व दिशा वाघ विजेते ठरले. मंडला आर्ट व पोस्टर स्पर्धेत कृष्णराज सोनवणे प्रथम, नेत्रा खराटे द्वितीय व दिशा वाघ तृतीय क्रमांकावर राहिले. दुसऱ्या दिवशी ग्रुप डे, ट्विन डे, रांगोळी स्पर्धा, म्युझिकल चेअर व दोरखेच स्पर्धा घेण्यात आल्या. म्युझिकल चेअर स्पर्धेत आरती वालवी, भावना दलाल व राज कुरे यांनी यश मिळवले. रांगोळी स्पर्धेत दिशा वाघ प्रथम, यश पवार व समूह द्वितीय, तर प्रियांका गावित तृतीय ठरली. रॅम्प वॉक स्पर्धेत श्रुस्ती डोंगरे प्रथम व पूर्वजा कुमावत द्वितीय ठरल्या. चौथ्या दिवशी नृत्य, नाटिका, माइम, गीत गायन व मिमिक्री स्पर्धांनी कार्यक्रमाची रंगत वाढवली. एकल नृत्य स्पर्धेत श्रुस्ती डोंगरे प्रथम व साक्षी बहेकर द्वितीय ठरल्या. समूह नृत्यात युगल धाके व समूह विजेते, तर हिटर्स समूह उपविजेते ठरले. नाटिका स्पर्धेत तृतीय वर्षाचे विद्यार्थी विजयी ठरले. मिमिक्रीमध्ये अमोड अख्तर प्रथम व नीरज सोनवणे द्वितीय ठरले. गीत गायन स्पर्धेत धीरज खेडकर प्रथम तर उदय माळी उपविजेता ठरला.

# रोटरी क्लब वर्षभरात ५०८६ रक्त पिशव्यांचे संकलन करणार

## रोटरी डिस्ट्रिक्टचे प्रांतपाल ज्ञानेश्वर शेवाळे यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी । जळगाव

**रोटरी वर्षात संपूर्ण डिस्ट्रिक्टची यशोगाथा ही डिस्ट्रिक्टमधील १२० क्लबची कथा असेल. यात वर्षभरात १००० नवीन सदस्य, १० लाख डॉलरचे डोनेशन, ३० नवीन क्लब, ५०८६ रक्त पिशव्यांचे संकलन, ५००० सायकलींचे गरजूना वाटप या गोष्टी प्रत्येक रोटरी सदस्यासाठी अभिमानाची गोष्ट असेल, असे प्रतिपादन रोटरी डिस्ट्रिक्ट ३०३०चे प्रांतपाल ज्ञानेश्वर शेवाळे यांनी केले.**




रोटरी क्लब जळगावच्या अधिकृत भेटीप्रसंगी ते बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर सहाय्यक प्रांतपाल डॉ.अपर्णा भट-कासार, अध्यक्ष गिरीश कुळकर्णी, मानद सचिव सुभाष अमळनेरकर उपस्थित होते. शेवाळे पुढे म्हणाले की, डिस्ट्रिक्टमधील विविध क्लबला दिलेली भेट माझ्यासाठी शिक्षणाची संधी असते. कारण मला यातून संस्कार, कर्तृत्व, आत्मपरीक्षण, संयम, नेतृत्वाचा परिचय होतो व क्षितिजापलीकडे जाण्याची संधी मिळते. रोटरी क्लब जळगावच्या भेटीत मला अनेक गोष्टी शिकायला मिळाल्या.

रोटरी क्लब जळगावचे कार्य शिस्त, परिपक्वता व परिपूर्णतेचा आदर्श आहे आणि त्यामुळेच तो माझ्या हृदयाजवळील क्लब आहे, असे सांगून ७६ वर्षांचा वारसा लाभलेल्या या क्लबला भेट देतांना मला नेहमीच अभिमान वाटतो.

क्लबच्या भेटीदरम्यान रोटरीला अपेक्षित असलेले कार्य मोठ्या प्रमाणावर झालेले दिसून आल्याचे गौरवोद्गार रोटरी डिस्ट्रिक्ट ३०३०चे प्रांतपाल ज्ञानेश्वर शेवाळे यांनी काढले. कार्यक्रमाची सुरुवात कॅप्टन मोहन कुळकर्णी यांच्या बासरीवरील गणेश वंदनेने झाली. अध्यक्ष गिरीश कुळकर्णी यांनी वर्षभरात राबविलेल्या महत्त्वपूर्ण उपक्रमांची थोडक्यात माहिती दिली.

### ➤ पॉवरपॉईंटद्वारे क्लबचा अहवाल सादर

संवाद सचिव पंकज व्यवहारे यांनी पॉवरपॉईंटद्वारे क्लबचा अहवाल सादर केला. यावर्षी जितेंद्र ढाके व डॉ. तुषार फिरके तसेच फाऊंडेशनला भरीव योगदान देणाऱ्या सदस्यांचा गौरव करण्यात आला. ॲड. हेमंत भंगाळे यांनी आभार मानले. राष्ट्रगीताने सभेची सांगता झाली. सभेस माजी प्रांतपाल डॉ.चंद्रशेखर सिकची, संजय गांधी, डिस्ट्रिक्टच्या फर्स्ट लेडी अनुपमा शेवाळे, क्लबच्या फर्स्ट लेडी अदिती कुळकर्णी, ज्येष्ठ सदस्य किरण बेंडाळे, अशोक जोशी, डॉ. प्रदीप जोशी, संदीप शर्मा, मनोज जोशी, डॉ. शुभदा कुळकर्णी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

